# तहसिलदार कार्यालयातील सेतू सुविधा केंद्राच्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेबाबत जाहिरात

महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं-1716/प्र.क्र. 517/39 दि. 19 जानेवारी 2018 अन्वये महाराष्ट्र राज्यात सध्या कार्यरत असलेली सर्व महा ई सेवा केंद्रे, सेतु सुविधा केंद्रे, नागरी सुविधा केंद्रे तसेच संग्राम केंद्रे यांना **"आपले सरकार सेवा केंद्र"** हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हीस सेंटरचे एकसारखे ब्रँडिंग करणेत आले आहे. सध्या प्रत्येक तालुक्याचे तहसिल कार्यालयात (करवीर व गगनबावडा वगळून) सेतू सुविधा केंद्र कार्यरत आहे. सदर सेतू सुविधा केंद्राची मुदत संपली आहे. आता सर्व तालुक्यांच्या ठिकाणी (करवीर वगळून) आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://kolhapur.gov.in या संकेत स्थळावरून अर्जाचा नमुना डाऊनलोड करून सदरचे अर्ज, अर्जात नमूद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांसह **31 मार्च 2020** पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचेकडे सादर करावेत.